RNI No. MAHBIL /2009/40124

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग पाच

वर्ष ११, अंक १२(१८)] शुक्रवार, जुलै ४, २०२५/आषाढ १३, शके १९४७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक ६१**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.**

---

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

महाराष्ट्र विधानसभेत दिनांक **४ जुलै, २०२५** रोजी पुरःस्थापित करण्यात आलेले खालील विधेयक महाराष्ट्र विधानसभा नियम **११६** अन्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

**L. A. BILL No. L OF 2025.**

A BILL

TO AMEND THE MAHARASHTRA MATHADI, HAMAL AND OTHER MANUAL WORKERS (REGULATION OF EMPLOYMENT AND WELFARE) ACT, 1969.

**सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५०.**

**महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीव कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ यात सुधारणा करण्याकरिता विधेयक.**

सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.३०.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनासाठी, महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे, **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :-

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) (सुधारणा) अधिनियम, २०२५ असे म्हणावे.

सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.३० याच्या अनुसूचीची सुधारणा.

**२.** (१) महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ याच्या अनुसूचीमधील नोंद क्रमांक १४ नंतर पुढील नोंद समाविष्ट करण्यात येईल :-

"१५. ऊस तोडणी करणे, भरणे, उतरवणे, वाहतूक करणे, वाहतुकीसाठी गाडीवान म्हणून काम करणे किंवा अशाप्रकारच्या कामाच्या अनुषंगिक व संबंधित असेल अशी साखर निर्मिती उद्योगातील नोकरी."

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र राज्यामध्ये साखर कारखान्यात पाच लाखांच्या वर ऊस तोडणी व गाडीवान कामगार गळीत हंगामाच्या दरम्यान वर्षातील पाच ते सात महिने आपली गावे सोडून दूरच्या ठिकाणी आपल्या कुटुंबियांसमवेत जातात. या कामगारांकडून करुन घेण्यात येणारे काम अत्यंत कष्टाचे असूनही त्यांनी केलेल्या श्रमाच्या तुलनेत त्यांना मजुरी दिली जात नाही. तसेच त्यांना पिण्याचो पाणी, निवास, शाळा, दवाखाना इत्यादी अत्यावश्यक सुविधाही उपलब्ध नसतात.

म्हणून या कर्मचाऱ्यांची, कामासंबंधीची परिस्थिती सुधारण्यासाठी आणि त्यांच्या सेवांना संरक्षण मिळवून देण्यासाठी व सध्याच्या अनुचित परिस्थितीतून त्यांना मुक्त करण्यासाठी या श्रमजीवी कामगारांच्या नोकरीचे नियमन करणे आणि त्यांच्या कल्याणासाठी नोकरीच्या योग्य अशा अटी आणि शर्ती यासाठी तरतूद करणे इष्ट आहे. त्यामुळे साखर कारखान्यामध्ये काम करणाऱ्या ऊस तोडणी व गाडीवान यांसारख्या असंरक्षित कामगारांना महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ याच्या कक्षेमध्ये आणण्यासाठी त्या अधिनियमात सुधारणा करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

म्हणून हे विधेयक मांडण्यात आले आहे.

**विधानभवन :**
मुंबई,
दिनांक २३ मे, २०२५.

**सुधीर मुनगंटीवार,**
प्रभारी सदस्य.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक ४ जुलै, २०२५.

**जितेंद्र भोळे,**
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.